# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय, लातूर



| Office : 02382-250634<br>Fax :- 02382-251866<br>E-mail:- celatur@mahadiscom.in | महावितरण | Office of the Exe. Engr. CGRF<br>Latur Zone, Vidyut Bhavan, Ground floor, Old power house, Sale galli, Latur – 413512 |
|---|---|---|
| EE/CGRF/LTR/ 80 | | Date :- 31.08.2018 |



**ग्राहक तक्रार क्र.** : १०/२०१८

**तक्रार दाखल दिनांक** : १८.०५.२०१८

**प्रति,**

**१. सौ. सुरेखा नागोराव माळी,**
मु. पो. फत्तेपूर ता. औसा,
जि. लातूर. ४१३५२०

**२. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
उप-कार्यकारी अभियंता, म. रा. वि. वि. कं. उपविभाग, औसा.

**विषय :-** तक्रार अर्ज क्र. १०/२०१८ प्रकरणी निकाल

वरील विषयास अनुसरुन सौ. सुरेखा नागोराव माळी, यांच्या तक्रार अर्जाप्रमाणे सुनावणी घेवून तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे. सदरील प्रकरणी निकालाची छायांकीत प्रत सोबत आपल्या माहितीस्तव जोडलेली आहे.

Sd/-
31/8

**कार्यकारी अभियंता**
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत
ग्राहक तक्रार निवारण मंच, लातूर

**सोबत :** वरीलप्रमाणे

**प्रतिलिपी सविनय सादर :-**

१. मुख्य अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, परिमंडल कार्यालय, लातूर

**प्रतिलिपी :-**

१. कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, मंडल कार्यालय, लातूर
२. कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, निलंगा



Scanned by CamScanner

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय लातूर**

**ग्राहक तक्रार क्रमांक** : १०/२०१८
**ग्राहक तक्रार दाखल दिनांक** : १८.०५.२०१८

**सौ. सुरेखा नागोराव माळी,**
**मु. पो. फत्तेपूर. ता. औसा**
**जि. लातूर. ४१३५२०**

**--ग्राहक अर्जदार**

**-- विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**उप कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. उपविभाग, औसा** **-- गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम :** | **माणिक व्ही.येवतीकर** | **अध्यक्ष** |
| | **एस. आर. कुलकर्णी** | **सचिव** |
| | **सुधीर भाऊराव देशमुख** | **सदस्य** |

**निकाल** **दि.३१.०८.२०१८**

ग्राहक अर्जदार, सौ. सुरेखा नागोराव माळी, मु. पो. फत्तेपूर, ता. औसा. जिल्हा लातूर, ग्राहक क्र.६२६०६००२०१२१ (कृषीपंप) यांनी त्यांची तक्रार अ फॉर्ममध्ये दि. १८.०५.२०१८ रोजी मंचामध्ये दाखल केली आहे व त्यांचे गाऱ्हाणे खालीलप्रमाणे आहे.

दि. ०२.०५.२०१७ रोजी मौजे फत्तेपूर ता. औसा या गावी त्यांच्या शेतातील पोलवरील एक तार तुटली व ती दुसऱ्या दिवशी त्यांच्या निदर्शनास आली. त्यांच्या पतीने श्री. बालाजी पन्नमवार, तंत्रज्ञ यांना कळविले व त्यांनी श्री. बालाजी कदम यांना पैसे देऊन ती तार जोडण्यास सांगीतले. पण पैसे मिळाले नाहीत म्हणून श्री. बालाजी कदम यांनी ती तार जोडली नाही. त्यामुळे त्यांनी प्रभारी इंजिनियर यांना माहिती दिली. पण काम न झाल्यामुळे उपकार्यकारी अभियंता व कार्यकारी अभियंता यांनाही फोनवरुन माहिती दिली. तरीही दोन दिवस पाठपुरावा करुन काम न झाल्यामुळे या सर्वांना सायंकाळी ४ ते १२ या वेळात विद्युत पुरवठा चालू असल्याने नुकसान होऊ नये म्हणून विद्युत पुरवठा बंद करण्याची विनंती केली. श्री. बालाजी कदम यांनी श्री. बालाजी पणम्मवार यांच्या सांगण्यावरुन ग्राहकाच्या गैरहजेरीत दि. ०६.०५.२०१७ रोजी तार जोडली. परंतु ग्राहकाच्या मोटारचे कनेक्शन चुकीचे दिल्यामुळे त्यांची ५ HP ची मोटर जळाली. प्रस्तुत घटना श्री. बालाजी पणम्मवार, तंत्रज्ञ महावितरण यांच्या बेजबाबदार वर्तनाने झाल्यामुळे नुकसान भरपाई मिळून त्यांच्यावर योग्यती कार्यवाही करावी ही त्यांची मागणी आहे. या बाबत त्यांनी अधिक्षक अभियंता यांच्याकडे पाठपुरावा केला आहे. तसेच जिल्हा अधिकारी यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्यात महावितरणचे कर्मचारी झिरोकडून कामे करुन घेतात व पैसे घेतात व सहाय्यक अभियंता, औसा दक्षिण यांचापण उल्लेख आहे.

या प्रकरणाची सुनावणी दि. २१.०८.२०१८ रोजी घेण्यात आली. महावितरण कंपनी तर्फे श्री. पी. एन. दुधाळे, उपकार्यकारी अभियंता उपविभाग औसा हे हजर होते. त्यांनी कथन केल्यानुसार दि. ०२.०५.२०१७ रोजी संध्याकाळी ७.३५ वा. तार तुटल्यानंतर श्री. बालाजी पन्नमवार यांच्या जबाबानुसार त्यांच रात्री ८.०० वा. सप्लाय बंद करुन तार कट करुन



Scanned by CamScanner

ठेवली. त्यानंतर इतर महत्वाचे कामे करुन दुसऱ्या दिवशी ५.४० वा. तार जोडली व त्यानंतर ग्राहकाचा कृषी पंप चालू असल्याची खात्री केली. श्री. दुधाळे यांच्या म्हणण्यानुसार विद्युत कनेक्शन चुकीचे दिल्यामुळे मोटार जळत नाही. त्यामुळे महावितरणच्या विद्युतपुरवठ्यामुळे ग्राहकाचे कोणतेही नुकसान झालेले नाही. श्री. पन्नमवार यांनी श्री. माळी यांचे वाचनालयाचे कनेक्शन बिल न भरल्याने बंद केले आहे. त्यांचा राग मनात धरुन ही तक्रार केलेली असावी असे नमूद केले आहे.

ग्राहका तर्फे श्री. नागोराव माळी उपस्थित होते. त्यांनी असे सांगितले की, त्यांच्या शेतात पडलेली तार चार दिवस जोडली नाही व विद्युत पुरवठा चालू होता. गावातील झिरो माणसाने तार वेगळ्याप्रकारे जोडून कनेक्शन दिल्यामुळे त्यांची मोटर जळाली. त्या दरम्यान श्री. बालाजी पन्नमवार त्या ठिकाणी एकदाही आला नाही व फोनवर उध्दट बोलत राहिला. तसेच कोणाकडेही तक्रार करा अशी अरेरावीची भाषा वापरली. याला सर्व शेतकरी साक्षीदार असून आपण शहानिशा करून योग्य तो निर्णय घ्यावा.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून श्री. बालाजी पन्नमवार, कनिष्ठ तंत्रज्ञ यांना दि. २८.०८.२०१८ रोजी सुनावणीस बोलावण्याचे ठरले. त्यांनी त्या दिवशी हजर राहून घडलेल्या घटने बद्दल दिलगीरी व्यक्त केली. व यापुढे अशा घटना घडणार नाहीत याची काळजी घेईन अशी हमी दिली.

श्री. पन्नमवार यांच्या सांगण्याप्रमाणे दि. ०२.०५.२०१७ रोजी तुटलेली तार दुसऱ्या दिवशी जोडली, परंतु अर्जदाराच्या म्हणण्यानुसार ती चार दिवसांनी जोडली. अशा वादग्रस्त परिस्थितीत फक्त एकच बाब सिध्द होते की, विद्युतभारीत तुटलेली तार तक्रार येताच जोडण्याचा प्रयत्न न केल्यास जिवित अथवा वित्तहानी होण्याचा संभव असतो. त्यामळे सार्वजनिकरित्या त्यासाठी महावितरण जबाबदार ठरले असते. अशा परिस्थितीत संबंधित कार्यरत कर्मचारी व अधिकारी जबाबदार धरले जाऊ शकतात. त्यासाठी संबंधीत कर्मचाऱ्यावर अधिकारप्राप्त अधिकाऱ्यामार्फत योग्य ती विभागीय चौकशी करणे उचित आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अशंतः मंजूर करण्यात आला.

२. कृतीच्या मानकांची पूर्तता न केल्यामुळे, म्हणजेच उच्चदाब वाहिनीत बिघाड झाला असता २४ तासाच्या आत विद्युतपूर्ववत न केल्यामुळे अर्जदारास ४८ तासाकरिता प्रतितास ५० रु. या प्रमाणे २४०० रु. नुकसान भरपाई देण्यात यावी.

३. श्री. बालाजी पन्नमवार, तंत्रज्ञ यांची विभागीय चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात यावी.

ग्राहक अर्जदारास मंचाचा निर्णय मान्य नसेल तर ग्राहक अर्जदार मंचाच्या निकालापासून ६० दिवसाच्या आत ब फॉर्म मध्ये आपले आवेदन खालील पत्त्यावर मा. विद्युत लोकपाल यांचे कडे सादर करू शकतात. फॉर्म ब या कार्यालयात कार्यालयीन वेळेत विनामूल्य मिळेल. मा. विद्युत लोकपाल यांचा पत्ता खालील प्रमाणे आहे.

मा.विद्युत लोकपाल
महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग,
प्लॉट नं.१२ श्रीकष्ण विजय नगर छावणी,
नागपूर-४४००१३.
दूरध्वनी क्र.०७१२-२०२२१९८
ठिकाण :- लातूर
दिनांक :- ३१.०८.२०१८

31/8/2018 — 31-8-2018 — 31-8-2018

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | सदस्य | कार्यकारी अभियंता/सचिव |
| ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर | ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर | ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर |



Scanned by CamScanner